# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०१/०४/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

## दरोडा

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील दिल्ली दरबार बार रेस्टारेंट नाका नं ७ कन्हान येथे दिनांक ३०/०३/२०२२ चे १८.५० वा. ते १९.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे– श्री आशिष आत्मारामजी वडस्कर वय ४२ वर्ष रा. रामनगर कन्हान हे आपले दिल्ली दरबार बार ॲन्ड रेस्टारेन्ट मध्ये डयुटीवर हजर असतांना आरोपी क्र. १) सोपान ठाकरे, २) लकी भेलावे, ३) अक्षीत मेश्राम, ४) अजय भेलावे ५) शिवप्रसाद उर्फ गोलु घनश्याम सहारे, वय ३० वर्ष, रा. कांद्री वार्ड क्र. १ झोपडपट्टी कन्हान व इतर ३ अनोळखी आरोपी यांनी संगणमत करून शुभम सलामे, रोहीत यादव यांना जिवे मारण्याचे उददेशाने बार मध्ये प्रवेश करून शुभम सलामे, रोहीत यादव यांचेवर तलवार व चाकुने हल्ला करून जिवे मारण्याचा प्रयत्न करून गंभीर जखमी केले. तसेच आरोपीतांनी बारचे काउंटरमधुन रोख रक्कम व दोन मोबाईल असा एकुण १,३९,०००/–रू. किमतीचा मुददेमाल दरोडा टाकुन जबरदस्तीने तलवार व चाकुचा धाक दाखवुन काउंटर मधुन घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३९७ भादंवि. सहकलम ४/२५ भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. ५ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री विलास काळे मो.नं. ९८६७११२१८५ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील बोरी सिंगोरी निखील मोखारे यांच्या शेतात येथे दिनांक २८/३/२२ चे २०.०० वा ते २९/३/२२ चे ०९.०० वा. फिर्यादी नामे– संदेश चरणदास फुलझले, वय ३० वर्ष रा. न्यु नरसाळा कामठी यांना मिळालेल्या माहीतीवरून फिर्यादीने प्रत्यक्ष घटनास्थळी जाउन पाहिले असता त्यांना ॲल्युमिनीयम तार अंदाजे ३००० पैकी १२०० फुट जागेवर पडलेला दिसला व १८०० फुट ॲल्युमिनीयम तार किमती एकुण ४५,०००/–रू. चा माल अज्ञात आरोपीने चोरुन नेल्याचे दिसले व पडलेला दिसला व ०५ सिमेंटचे पोल तुटुन अंदाजे २५,०००/–रु. चे नुकसान झालेले दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३९७ भादंवि. सहकलम १३६ भारतीय विद्युत कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नरेश वरखडे मो.नं. ९६३७००५३०३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा कुही येथे दिनांक २६/०३/२०२२ चे ०९.३० वा. फिर्यादी नामे— प्रमोद गुलाबराव लांजेवार वय ४४ वर्ष, रा. कुही वार्ड क्र ८ शारदा चौक कुही यांची पत्नी ही गजानन नागरी पथ संस्था येथील डेली कलेक्शन करीत असते घटना तारखेला फिर्यादीची पत्नी ही डेली कलेक्शन पैसे बघण्याकरीता बॅग उघडुन बघितली असता त्यांमध्ये २३,९१०/—रू. ठेवलेल्या पैकी १५,००/—रू. दिसले २२,४१०/—रू. बॅग मध्ये दिसले नाही. अज्ञात आरोपीने बॅग मधील डेली कलेक्शन चे एकुण २२,४१०/—रू. चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री देविदास ठमके मो क्र ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**